लुथ्रा बंधूंविरोधात 'ब्लू कॉर्नर नोटीस'

नवी दिल्ली, पणजी : गोव्यातील आगप्रकरणी नाइटक्लबचे मालक सौरभ लुथ्रा आणि गौरव लुथ्रा यांच्याविरोधात इंटरपोलने 'ब्लू कॉर्नर नोटीस' बजावली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या कार्यालयाने मंगळवारी दिली.

याबरोबरच, गोवा पोलिसांनी अजय गुप्ता आणि सुरिंदर कुमार खोसला या दोघांविरोधात लुकआउट नोटीस बजावण्यात आली, त्यापैकी गुप्ताला नवी दिल्लीतून ताब्यात घेतण्यात आले. खोसला ब्रिटिश नागरिक आहे. लुथ्रा बंधूंना भारतात आणण्यासाठी सर्व प्रयत्न सुरू असल्याचे पोलीस उपमहानिरीक्षक वर्षा शर्मा यांनी सांगितले.

उत्तर गोव्यातील हडफडे येथील 'बर्च बाय रोमियो लेन' नाइटक्लबला शनिवारी रात्री उशिरा लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला. नाइटक्लबचे मालक सौरभ लुथ्रा आणि गौरव लुथ्रा हे या घटनेनंतर थायलंडला पळून गेले. त्याचवेळी या क्लबच्या तिसऱ्या मालकाचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, या प्रकरणाचा न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास करण्यात यावा अशी विनंती करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात मंगळवारी दाखल करण्यात आली. बेकायदा नाइटक्लब उभारणीमध्ये अधिकाऱ्यांनी कर्तव्यपालन केले नसल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केली आहे.

बेकायदा शॅक जमीनदोस्त

गोव्याच्या पर्यटन विभागाने मंगळवारी लुथ्रा बंधूंच्या मालकीचा बेकायदा 'रोमियो लेन शॅक' पोलिसांच्या उपस्थितीत जमीनदोस्त केला. हा शॅक पर्यटन विभागाच्या जमिनीवर बांधण्यात आला होता. तो पाडण्याचे आदेश मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिल्यानंतर सर्व औपचारिकता पूर्ण करून तो पाडण्यात आला.

'वंदे मातरम'चा अपमान

अमित शहा यांची काँग्रेसच्या नेत्यांवर टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : पश्चिम बंगालमध्ये निवडणूक असल्याने राजकीय फायद्यासाठी 'वंदे मातरम'वर चर्चा केली जात असल्याचे काँग्रेसच्या काही नेत्यांचे म्हणणे आहे. काहींनी तर 'वंदे मातरम'वर चर्चा करण्याची गरज काय, असे विचारले. पण, काँग्रेसच्या नेत्यांनी 'वंदे मातरम'चा अपमान केला आहे, त्यांची कृती आक्षेपार्ह ठरते, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत 'वंदे मातरम'वरील चर्चेत मंगळवारी केला.

'वंदे मातरम'वरील चर्चेची गरज पूर्वीही होती, आजही आहे आणि पुढेही असेल, असे सांगत शहा म्हणाले की, ''आपण 'वंदे मातरम'ची पार्श्वभूमी लक्षात ठेवली पाहिजे. शतकानुशतके इस्लामिक आक्रमणांनी आपल्या देशाची संस्कृती आणि इतिहास उद्ध्वस्त झाला. त्यानंतर, ब्रिटिश राजवटीत नवी सभ्यता व संस्कृती लादण्याचा प्रयत्न झाला. या पार्श्वभूमीवर बंकिमबाबूंनी 'वंदे मातरम'ची रचना केली.''

'वंदे मातरम'वर लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पंडित जवाहरलाल नेहरूंवर केलेल्या आरोपांचा शहांनी पुनरुच्चार केला. 'वंदे मातरम'ला ५० वर्षे पूर्ण झाली तेव्हा देश पारतंत्र्यात होता, नेहरूंनी 'वंदे मातरम'ची दोन कडवी स्वीकारली, या गीताचे तुकडे केले. नेहरूंच्या तुष्टीकरणाच्या धोरणामुळे देशाची फाळणी झाली, असा आरोप शहांनी केला. 'वंदे मातरम'ने स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली. आता भारताला पुन्हा महान देश बनण्यासाठीही 'वंदे मातरम' प्रेरणा देईल,असेही शहा म्हणाले.



१०० वर्षे पूर्ण झाली तेव्हा 'वंदे मातरम' म्हणणाऱ्यांना आणीबाणी लादून तुरुंगात टाकले. आता १५० वर्षे पूर्ण होत असताना त्यावरील चर्चेवेळी गांधी कुटुंबातील सदस्य अनुपस्थित राहतात. त्यावरून गांधी-नेहरू वंदे मातरम विरोधात असल्याचे दिसते.
- अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री

अपमान केलेल्या नेत्यांची यादी सभापतींकडे!

'वंदे मातरम'च्या चर्चेला काँग्रेसने विरोध केला नव्हता. काँग्रेसच्या कोणी 'वंदे मातरम'चा अपमान केला हे सांगा, असे काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी शहांनी विचारले. त्यावर, नावांची यादी पटलावर ठेवली जाईल, असे स्पष्ट केले. मंगळवारी संध्याकाळी काही काँग्रेस नेत्यांच्या नावांचा समावेश असलेली यादी सभापतींकडे देण्यात आली.

मोदींनी देशाची माफी मागावी!

नेहरूंची बदनामी केल्याचा आरोप करत खरगेंची मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : नरेंद्र मोदी, अमित शहा सातत्याने पंडित नेहरूंवर टीका करतात, त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. 'वंदे मातरम'ची पहिली दोन कडवी स्वीकारण्याची निर्णय एकट्या नेहरूंचा नव्हता. पण, मोदी पूर्ण सत्य सांगत नाहीत. त्यांनी देशाची माफी मागितली पाहिजे, अशी आक्रमक भूमिका राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी वंदे मातरमवरील चर्चेत बोलताना घेतली.

''आम्ही नेहमीच 'वंदे मातरम' गात आलो आहोत. पण, ज्यांनी ते गायले नाही, त्यांनी आता ते गायला सुरू केले आहे. ही 'वंदे मातरम'ची शक्ती आहे. हा एक राष्ट्रीय उत्सव आहे, हा चर्चेचा विषय नव्हे,'' असे खरगे म्हणाले. खरगे म्हणाले, ''१९२१मध्ये असहकार चळवळ सुरू झाली, तेव्हा काँग्रेसचे कार्यकर्ते 'वंदे मातरम'चा जयजयकार करत

मोदी, शहांनी नेहरूंवर केलेला मुस्लिम तुष्टीकरणाचा आरोप चुकीचा आहे. बंगालमध्ये मुस्लिम लीगशी युती करून सरकार स्थापन करणारे जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी होते, नेहरू नव्हते.
- मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते, राज्यसभा

तुरुंगात जात होते. तेव्हा तुम्ही काय करत होता? तुम्ही ब्रिटिशांसाठी काम करत होता. तुम्ही संविधानाला, तिरंग्याला विरोध केला. रामलीला मैदानावर संविधानाची प्रत कोणी जाळली? तुम्ही देशभक्तीला घाबरत होता, ब्रिटिशांची चाकरी करत होतात,'' अशी टीका खरगेंनी केली.

संसदेत सत्ताधाऱ्यांचीच कोंडी

खरगे, राहुल गांधी यांच्या भाषणांदरम्यान भाजप सदस्यांचा गदारोळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : 'वंदे मातरम'च्या चर्चेत राज्यसभेत तर, निवडणूक सुधारणांच्या चर्चेत लोकसभेत मंगळवारी सभागृहांतील विरोधी पक्षनेते अनुक्रमे मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांनी अचानक सत्ताधारी पक्षाला घेरल्याने विरोधकांना आवरण्यासाठी खुद्द भाजपच्या सदस्यांना प्रचंड गोंधळ घालावा लागला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्या आक्रमक भाषणांनंतर विरोधकांची कोंडी होण्याची अपेक्षा असताना केंद्र सरकारच अडचणीत आल्याने राज्यसभेत केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डांचा संताप अनावर झाला. लोकसभेतही संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांना हस्तक्षेप करावा लागला.

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या समोर सत्ताधाऱ्यांचा गोंधळ सुरू होता. राज्यसभेत खरगे भाजपच्या सदस्यांच्या विरोधाला जुमानत नसल्याचे तसेच, त्यांनी भाषणातील मुद्देही कायम ठेवल्याचे पाहून शहाच सभागृहातून निघून गेले.

सभापतींचाही विरोधी पक्षनेत्यांना रोखण्याचा प्रयत्न

खरगेंना रोखण्याचा प्रयत्न सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनीही केला. मल्लिकार्जुन खरगेंचे बोलणे असंसदीय असल्याचा दावा करत राधाकृष्णन यांनी खरगेंच्या भाषणातील इतर मुद्दे इतिवृत्तांतून काढून टाकण्याचा आदेश दिला. सभापती राधाकृष्णन यांनी खरगेंना बोलण्याची परवानगी दिल्यावर खरगेंनी भाषण पुढे सुरू केले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचा गोंधळ वाढत गेला. आम्हीही भारताचे नागरिक आहोत. म्हणून मी लोकांना भेडसावणाऱ्या विषयांवर बोलत आहे, असे खरगे म्हणाले. तुम्ही (भाजप सरकारने) दलितांवर अन्याय करत आहात, असा आरोप खरगेंनी केला.

खरगेंनी भाषणामध्ये 'वंदे मातरम'ला जोडून आर्थिक धोरण, घसरलेला रुपया, परराष्ट्र धोरण, चीन संबंध, अमेरिकेशी बिघडलेले नाते, उद्योग धोरण, सामाजिक अन्याय अशा मुद्द्यांवर भाष्य केले. खरगे या मुद्द्यांच्या आधारे केंद्र सरकारवर प्रहार करत होते. काही मिनिटांनी सत्ताधाऱ्यांना आपलीच कोंडी होत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी खरगेंच्या भाषणाला तीव्र आक्षेप घेतला.

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी संघावर टीका केल्यानंतर भाजपच्या सदस्यांनी तीव्र विरोध केला. संघ-भाजप एकामागून एक स्वायत्त व घटनात्मक संस्था ताब्यात घेऊन लोकशाही व्यवस्थेची वीण नष्ट करत असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. संघावर टीका केल्यानंतर मात्र सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी राहुल गांधी विषयांतर करत असल्याचा आरोप करत सभागृहात गोंधळ घातला. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनीही मुद्द्याचे बोला, सर्वसाधारण विषयांवर बोलायचे असेल तर राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेत बोला, असे बिर्लांनी सांगितले.

'मतचोरी' देशविरोधी कृत्य!

(पान १ वरून) विश्वास नाही का? मी निवड समितीत आहे पण, माझे मत विचारात घेतले जात नाही. २०२३मध्ये, त्यांनी कायदा बदलला, जेणेकरून कोणत्याही निवडणूक आयुक्ताला त्या पदावर असताना केलेल्या कोणत्याही कृतीसाठी शिक्षा होऊ नये.''

'मतचोरीचे पद्धतशीर डाव'

मतचोरीबाबत पत्रकार परिषदांमध्ये केलेल्या आरोपांचा पुनरुच्चारही राहुल यांनी केला. हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत ब्राझीलच्या मॉडेलचे छायाचित्र २२ वेळा कसे वापरले गेले? एकाच महिलेचे नाव २०० वेळा मतदारयाद्यांमध्ये कसे आले? बिहारमध्ये मतदार फेरआढावा मोहीम (एसआयआर) झाल्यानंतरही मतदारयाद्यांमध्ये १.२ लाख दुबार मतदार कसे राहतात, अशा प्रश्नांची सरबत्ती केली.

'संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न'

संघाने देशातील एकापाठोपाठ एक संस्था ताब्यात घेतल्या असून त्यामध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाचाही समावेश आहे, असा आरोप करत, ''आपल्या सर्व संस्था मतदानातून उदयास आल्या आहेत. म्हणूनच संघाला प्रत्येक संस्था ताब्यात घ्यायची असते. गांधीजींच्या हत्येनंतरचा पुढचा प्रकल्प म्हणजे सर्व संस्था ताब्यात घेणे. माझ्या 'मित्रां'ना (भाजप सदस्य) माझा युक्तिवाद आवडत नाही. राष्ट्रपित्याची हत्या झाल्यानंतर, समतेवर आधारलेल्या भारताचे त्यांचे स्वप्न नष्ट करायचे आहे. आज भारतीय विद्यापीठांमध्ये सामान्य कुवतेचे कुलगुरू कसे नियुक्त केले जातात हे सर्वांना माहिती आहे,'' अशी टीका राहुल गांधींनी केली.

तिरुपती-शिर्डी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा

नवी दिल्ली : रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा यांनी मंगळवारी रेल भवन येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून तिरुपती-साईनगर शिर्डी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवला. यामुळे दळणवळण, धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल अशी आशा सोमण्णा यांनी व्यक्त केली. तिरुपती आणि शिर्डी प्रवासासाठी ३० तास लागणार असून परळी वैजनाथ या ज्योतिर्लिंग तीर्थासह चार राज्यांतील एकूण ३१ महत्त्वाच्या स्थानकांवर ही रेल्वेगाडी थांबणार आहे.

परिस्थिती हाताळा, अन्यथा अराजक!

न्यायालयाचा निवडणूक आयोगाला इशारा

पीटीआय, नवी दिल्ली

पश्चिम बंगाल आणि अन्य राज्यांमध्ये मतदारयाद्यांची विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेचे (एसआयआर) काम करणाऱ्या मतदान केंद्र अधिकाऱ्यांना (बीएलओ) धमकावले जात असल्याच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी गंभीर दखल घेतली.

काही बीएलओंवर हल्ले करण्यात आले असून निवडणूक आयोगाने परिस्थिती हाताळावी, अन्यथा अराजकता निर्माण होईल, असा इशारा दिला. निवडणूक आयोगाला याबाबत उत्तर देण्यासाठी नोटीसही पाठवण्यात आली. सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी सुरू आहे.

एसआयआर मोहिमेत राज्य सरकार सहकार्य करत नसल्याच्या आरोपावर खंडपीठाने चिंता व्यक्त केली. सहकार्याचा अभाव, बीएलओंच्या कामात अडथळे यांसारख्या घटना निदर्शनास आणल्यानंतर आम्ही योग्य आदेश देऊ, असे खंडपीठाने निवडणूक आयोगाची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील राकेश द्विवेदी यांना सांगितले.

''राज्य सरकारांनी आम्हाला सहकार्य करावे आणि आम्हाला संरक्षण द्यावे. राज्य सरकारांनी तसे करण्यास नकार दिला तर स्थानिक पोलिसांना प्रतिनियुक्तीवर घेण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नाही. जर परिस्थिती अजूनही सुधारली नाही तर केंद्रीय दलांना बोलवावे लागेल,'' असे द्विवेदी यांनी न्यायालयाला सांगितले. मात्र निवडणूक प्रक्रिया सुरू होईपर्यंत आयोग पोलिसांना त्यांच्या अधिकारक्षेत्रात घेऊ शकत नाही, असे न्या. बागची यांनी सांगितले.

बीएलओ आणि इतर अधिकाऱ्यांना धमकावण्याच्या घटनांना सामोरे जाण्यासाठी निवडणूक आयोगाकडे सर्व संवैधानिक अधिकार आहेत, असे द्विवेदी यांनी सांगितल्यानंतर ''परिस्थिती खूप गंभीर आहे. परिस्थिती हाताळा अन्यथा अराजक निर्माण होईल,'' असे सरन्यायाधीश म्हणाले. तसेच हे एका बाजूने केलेले कथन आहे का, हे शोधण्याचा प्रयत्न करत आहोत, असे न्यायालय म्हणाले.

'ग्लोबल ह्युमेन सोसायटी'चा अनंत अंबानी यांना पुरस्कार

वॉशिंग्टन : 'वनतारा' या वन्यजीव संवर्धन केंद्राचे संस्थापक अनंत अंबानी यांचा अमेरिकेतील 'ग्लोबल ह्युमेन सोसायटी'ने जागतिक मानवतावादी पुरस्कार देऊन गौरव केला. प्राणी कल्याणासाठी केलेल्या कामामुळे त्यांना हा सन्मान देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

हा पुरस्कार प्रदान करण्यात आलेले अनंत अंबानी हे सर्वांत तरुण तसेच पहिले आशियाई व्यक्ती ठरले आहेत. वॉशिंग्टनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका आंतरराष्ट्रीय सोहळ्यामध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

'वनतारा'मध्ये प्राणी कल्याणाचे कार्य करताना त्याला विज्ञानाची जोड देण्यात आली आहे. यामुळे मानव व प्राण्यांमधील सहजीवनाला बळकटी मिळत असते. त्याचा प्रामुख्याने गौरव करण्यात येत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. रॉबिन गॅन्झर्ट यांनी दिली.

Reliance Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: उषा मंजल, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

भागधारकांना सूचना

छापील स्वरूपातील समभागांच्या हस्तांतरणाची विनंती पुन्हा सादर करण्यासाठी विशेष खिडकी

वर नमूद करण्यात आलेल्या विषयाच्या संदर्भात सेबीचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ दिनांक २ जुलै, २०२५, कृपया याची नोंद घ्यादी की हस्तांतरण करार पुन्हा सादर करण्यासाठी एक विशेष खिडकी ६ जानेवारी, २०२६ पर्यंत खुली राहील.

हस्तांतरण करार १ एप्रिल, २०१९ पूर्वी सादर केले असल्यास, आणि दस्तऐवजातील तृटींमुळे परत केले असल्यासच फक्त ही सुविधा उपलब्ध आहे.

तुम्हाला या संधीचा लाभ घेण्याची इच्छा असल्यास, कृपया कंपनीचे रजिस्ट्रार आणि हस्तांतरण एजंट म्हणजे केफिन टेक्नॉलॉजीस लिमिटेड (युनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड) यांच्याशी त्यांचे सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ व ३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट नानाक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२, येथील कार्यालयात संपर्क साधावा.

सदर समभाग हस्तांतरणासाठी पुन्हा सादर करण्यात आल्यास, ते मंजूर करण्यात आल्यास, ते तुमच्या नावे डिमॅट स्वरूपात जारी करण्यात येतील आणि हस्तांतरणाच्या तारखेपासून ६ महिन्यांसाठी लॉकमध्ये असतील.

अधिक माहितीसाठी, कृपया सेबीचे परिपत्रक पहा: **https://tinyurl.com/sebicjul25** किंवा **rilinvestor@kfintech.com** येथे ईमेल पाठवा.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १० डिसेंबर, २०२५

www.ril.com

जा.क्र. ६१४५/२०२५ दिनांक: ०४/१२/२०२५
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, सास्मिरा इमारत, सास्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०.

जाहिर नोटिस

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम ३५ अंतर्गत,
अर्ज क्रमांक :- ०६/२०२५
न्यासाचे नाव :- "श्री. विठ्ठा सर्वोदय ट्रस्ट मुंबई"
न्यास नोंदणी क्रं :- ई-१३२८२ (मुंबई)

प्रतिष्ठित व अनुभवी ठेकेदारांकडून अंदाजे १८०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या रुग्णालय बांधकामासाठी ऑफर्स **"श्री. विठ्ठा सर्वोदय ट्रस्ट, मुंबई"**, एक सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय - मातूश्री रतनबेन पालन, मनेक मारू हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, २८६ - बी, डॉ. आंबेडकर रोड, भारतमाता सिनेमा पुढे, एच. पी. पेट्रोल पंपाजवळ, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे आहे- यांच्या वतीने मागविण्यात येत आहेत. हया मालमत्तेचा सविस्तर तपशील खालील अनुसूचीत नमूद केला आहे. त्या मालमत्तेवर वरील कामांसाठी भावी बांधकाम ठेकेदार यांची नियुक्ती संयुक्त धर्मादाय आयुक्त (१), मुंबई, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेवर अवलंबून राहील.

सीलबंद ऑफर्स धर्मादाय सह-आयुक्त (१), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात- दुसरा मजला, सस्मिरा इमारत, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०- येथे १० जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचणे आवश्यक आहे. ऑफर्स देणाऱ्यास ट्रस्टच्या वास्तुविशारदांनी/आर्किटेक्टनी मंजूर केलेल्या नकाशे व तपशीलांनुसार रुग्णालयाची इमारत बांधण्याची आवश्यकता आहे.

सीलबंद ऑफर्स या धर्मादाय सह-आयुक्त (१), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात - दुसरा मजला, सस्मिरा इमारत, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०- १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११. ०० वाजता उघडण्यात येतील. इच्छुक सर्व ऑफरदार या वेळी उपस्थित राहू शकतात तसेच आवश्यक असल्यास आपली ऑफर सुधारित (संशोधित) करू शकतात.

मालमत्तेची अनुसूची (SCHEDULE OF THE PROPERTIES)

१) मालमत्ता क्र. १
एकूण ३०४ चौ. गज (सुमारे २५४. १४ चौ. मी.) क्षेत्रफळाचा जमीन तुकडा किंवा प्लॉट, ज्यामध्ये उत्तर आणि पूर्व बाजूस असलेल्या सामायिक मार्गाच्या (Common Passage) ४७ चौ. गज (सुमारे ३९.२९ चौ. मी.) क्षेत्रफळाची जमीन ही कॅडस्ट्रल सर्व्हे क्रमांक १०६ आणि सी. एस. क्रमांक १/१०५ (भाग), परळ-शिवडी विभागातील २८६-बी, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे स्थित आहे.

२) मालमत्ता क्र. २
परेल-सेवरी विभागातील सी.एस. क्रमांक १/१०४ येथील जमीन तुकडा किंवा प्लॉट, सुमारे २०९ चौ. गज (समान अंदाजे १७४.७५ चौ. मी.) क्षेत्रफळासह, मागील बाजूस असलेल्या गल्लीसह, आणि परळ-शिवडी विभागातील सी.एस. क्रमांक १/१०५ (भाग) शी संबंधित सुमारे ३४ चौ. गज (सुमारे २८.४३ चौ. मी.) क्षेत्रफळाची जमीन ही सर्व मालमत्ता २८६-बी, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे स्थित आहे.

ही सूचना माझ्या सही व महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील धर्मादाय आयुक्त यांच्या शिक्क्यासह प्रदान करण्यात येत आहे. दिनांक ०४/१२/२०२५.

आपली विश्वासू,
सही/-
(सीमा केणी)
अधिक्षक (न्याय),
धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
शिक्का

Glenmark

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : बी/२, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, महालक्ष्मी, मुंबई-४०० ०२६;
कॉर्पोरेट कार्यालय : ग्लेनमार्क हाऊस, बी.डी.सावंत मार्ग, चकाला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगत, अंधेरी (पू), मुंबई-४०० ०९९.
टेलि नं. : +९१ २२ ४०१८ ९९९९; फॅक्स नं. : +९१ २२ ४०१८ ९९८६
वेबसाइट : www.glenmarkpharma.com; **ईमेल :** complianceofficer@glenmarkpharma.com
CIN : L24299MH1977PLC019982

प्रत्यक्ष भागांच्या स्थानांतरण विनंत्यांच्या पुन-नोंदणीकरिता विशेष खिडकी संबंधित सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, "सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया"ने ("सेबी") तिचे सव्युर्लर नं. सेबी / एचओ / एमआयआरएसडी / एमआयआरएसडी-पीओडी / पी / सीआयआर / २०२५ / ९७ दिनांकित, ०२ जुलै, २०२५ च्या अनुसार प्रत्यक्ष भागांच्या स्थानांतरण विनंत्यांच्या पुन-नोंदणीकरिता विशेष खिडकी सुरू केली आहे.
उक्त सव्युर्लरच्या तरतुदींच्या अनुसार, गुंतवणूकदार ज्यांनी ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी प्रत्यक्ष भागांच्या स्थानांतरण विनंत्या सादर केल्या होत्या आणि ज्यांच्या विनंत्या मंजूर झालेल्या नव्हत्या, परत केल्या होत्या किंवा कागदपत्रे / प्रक्रियेतील विसंगती / किंवा अन्य कारणास्तव दुर्लक्षित्या होत्या, या सदर विनंत्यांच्या पुन-नोंदणीकरिता आता ०६ जानेवारी, २०२६ पर्यंत विशेष खिडकीस मंजूरी देण्यात आली आहे.
पात्र भागधारक, जे या संधीचा लाभ घेवू इच्छित आहेत त्यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजन्ट म्हणजेच "मेसर्स केफिन टेक्नोलॉजिस लिमिटेड" ("केफिन") पुढील पत्यावर : सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, टोल-फ्री नं. : १८००-३४५४-००१, ईमेल : einward.ris@kfintech.com, वेबसाइट : www.kfintech.com येथे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.
गुंतवणूकदारांना याद्वारा कळविण्यात आले आहे की, वरील सव्युर्लरच्या अनुसार स्थानांतरणाकरिता प्रतिभूतींची पुन-नोंदणी केली असल्यास, केवळ डिमॅट स्वरूपात निर्गमन करण्यात येणार आहे. कोणत्याही शंकांकरिता, भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी einward.ris@kfintech.com यावर "केफिन"कडे सेवा विनंती करावी किंवा complianceofficer@glenmarkpharma.com यावरून कंपनीला लेखी कळवता येईल.
गुंतवणूकदारांच्या हितार्थ सुरू केलेल्या या विशेष खिडकीचा लाभ घेण्यास भागधारकांना प्रोत्साहित करण्यात आले आहे.

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
हरीश कुबेर
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
स्थळ : मुंबई
दिनांक : ०९ डिसेंबर, २०२५

जा.क्र. ६१४४/२०२५ दिनांक: ०४/१२/२०२५
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, सास्मिरा इमारत, सास्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०.

जाहिर नोटिस

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम ३५ अंतर्गत,
अर्ज क्रमांक :- ०६/२०२५
न्यासाचे नाव :- "श्री. विठ्ठा सर्वोदय ट्रस्ट मुंबई"
न्यास नोंदणी क्रं :- ई-१३२८२ (मुंबई)

प्रतिष्ठित व अनुभवी वास्तुविशारद/ आर्किटेक्ट, जे कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर येथे विधिपूर्वक नोंदणीकृत आहेत, अशांकडून अंदाजे १८०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या रुग्णालय बांधकामासाठी स्थानिक प्राधिकरणाकडून DCPR-2034 नुसार नकाशे व तपशील (Plans & Specifications) मंजूर करून घेण्यासाठी तसेच बांधकामाची देखरेख करण्यासाठी आवश्यक व्यावसायिक सेवेच्या प्रदानासाठी ऑफर्स/निविदा मागविण्यात येत आहेत. ही ऑफर्स **"श्री. विठ्ठा सर्वोदय ट्रस्ट, मुंबई"**, एक सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय - मातूश्री रतनबेन पालन, मनेक मारू हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, २८६ - बी, डॉ. आंबेडकर रोड, भारतमाता सिनेमा पुढे, एच. पी. पेट्रोल पंपाजवळ, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे आहे- यांच्या वतीने मागविण्यात येत आहेत. ज्या मालमत्तेचा सविस्तर तपशील खालील अनुसूचीत नमूद केला आहे त्या मालमत्तेवर वरील कामांसाठी वास्तुविशारद/आर्किटेक्ट नियुक्त करण्यात येईल. निवडल्या जाणाऱ्या वास्तुविशारदाची/आर्किटेक्टची जबाबदारी म्हणजे डिझाइन, आराखडा, तपशीलपत्रे तयार करणे तसेच MCGM कडून DCPR- २०३४ च्या लागू असल्यास त्या-त्या नियमानुसार मंजुरी मिळवून देणे हे असेल.
सीलबंद ऑफर्स धर्मादाय सह-आयुक्त (१), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात दुसरा मजला, सस्मिरा इमारत, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३० . येथे १० जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचणे आवश्यक आहे. प्राप्त ऑफर्स या धर्मादाय सह-आयुक्त (१), मुंबई यांच्या मान्यतेस अधीन राहतील.
सीलबंद ऑफर्स या धर्मादाय सह-आयुक्त (१), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात दुसरा मजला, सस्मिरा इमारत, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०-१० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११. ०० वाजता उघडण्यात येतील. इच्छुक सर्व ऑफरदार या वेळी उपस्थित राहू शकतात तसेच आवश्यक असल्यास आपली ऑफर सुधारित (संशोधित) करू शकतात.

मालमत्तेची अनुसूची (SCHEDULE OF THE PROPERTIES)

१) मालमत्ता क्र. १
एकूण ३०४ चौ. गज (सुमारे २५४. १४ चौ. मी.) क्षेत्रफळाचा जमीन तुकडा किंवा प्लॉट, ज्यामध्ये उत्तर आणि पूर्व बाजूस असलेल्या सामायिक मार्गाच्या (Common Passage) ४७ चौ. गज (सुमारे ३९.२९ चौ. मी.) क्षेत्रफळाची जमीन ही कॅडस्ट्रल सर्व्हे क्रमांक १०६ आणि सी. एस. क्रमांक १/१०५ (भाग), परळ-शिवडी विभागातील २८६-बी, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे स्थित आहे.

२) मालमत्ता क्र. २
परेल-सेवरी विभागातील सी.एस. क्रमांक १/१०४ येथील जमीन तुकडा किंवा प्लॉट. सुमारे २०९ चौ. गज (समान अंदाजे १७४.७५ चौ. मी.) क्षेत्रफळासह, मागील बाजूस असलेल्या गल्लीसह, आणि परळ-शिवडी विभागातील सी.एस. क्रमांक १ / १०५ (भाग) शी संबंधित सुमारे ३४ चौ. गज (सुमारे २८. ४३ चौ. मी.) क्षेत्रफळाची जमीन ही सर्व मालमत्ता २८६-बी, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई- ४०० ०१२ येथे स्थित आहे.

ही सूचना माझ्या सही व महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील धर्मादाय आयुक्त यांच्या शिक्क्यासह प्रदान करण्यात येत आहे. दिनांक ०४/१२/२०२५.

आपली विश्वासू,
सही/-
(सीमा केणी)
अधिक्षक (न्याय),
धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
शिक्का